Date ..................
Page ..................

सभा क्र ४

13/07/025 रोजी मा. मुख्याध्यापक सौ अनुराधा अल्लम यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेच्या सभागृहात आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस हजर रहाणे. सभेमध्ये विषय खालिल प्रमाणे.

विषय क्र. १) मागील दि. 02/05/२५ रोजीच्या सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.

विषय क्र २) महिला व विद्यार्थ्यांनी यांना विशाखा समिती बद्दल मार्गदर्शन व माहिती देणे बाबत चर्चा करणे.

विषय क्र ३) मा. मुख्याध्यापकांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन स्वरक्षणासाठी.

विषय क्र ४) अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणारे विषय

* इतिवृत्त *

रोजी सकाळी ११ वाजता मा. मुख्याध्यापक सौ. अनुराधा अल्लम य अध्यक्षतेखाली महिला तक्रार निवारण समितीची सभा संस्थेच्या कार्यालयात सु झाली.

सभेमध्ये खालील प्रमाणे सभासद उपस्थित होते. सभेमध्ये खालील प्रमाणे कामकाज झाले.

Date ..........
Page ..........

ठराव क्र १ 13/07/22 रोजीच्या सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.

ठराव क्र 2) या सभेमध्ये मा. मुख्याध्यापक सौ अनुराधा अल्लम यांनी उपस्थित सर्व महिला व विद्यार्थ्यांनी यांना विशाखा समिती म्हणजे काय ? याविषयीची माहिती सांगण्यास सुरुवात केली. त्यांनी सभेस सांगितल की कामाच्या / व्यवसायाच्या ठिकाणी विशाखा मार्गदर्शक तत्वाचे पालन करण्यासाठी काम देणाऱ्या विशाखा कमिटी स्थापन करणे बंधनकारक आहे. महिलांना कामाच्या ठिकाणी सुरक्षित वाटणे. कुठल्याही प्रकारचा छळ होऊ नये यासाठी कमिटीला काम करावे लागते. याला विशाखा कमिटी असेही म्हणतात, ही समिती जेथे 10 किंवा अधिक जण काम करतात. अशा ठिकाणी असणे बंधनकारक आहे. अशा प्रकारचे महिला विषयीच्या कायद्याचे मार्गदर्शन सभेमध्ये करण्यात आले. या ठरावास मंजूरी देण्यात आली.

ठराव क्र. 3) या सभेमध्ये मा. मुख्याध्यापकांनी मुलींनी किंवा महिलांनी स्वरक्षणार्थ काय केले पाहिजे आपल्या आजूबाजूच्या लोकांना कसे ओळखावे त्यासाठी आपण कसे आपले संरक्षण करावे उदा. तुम्ही सार्वजनिक ठिकाणी असताना तुमच्या ड्रिंकवर नजर ठेवा. मित्रा- शोबत घरी फिरणे, तुमच्या मित्रांना तपासा

आणि ते सुरक्षीत असल्याचे खात्री करा यामुळे बरचसे गुन्हे कमी होतील त्याचबरोबर स्त्री-समक्षीकरण म्हणजे काय कायदे-कल्याण कार्यक्रमाच्या माध्यमातून आर्थिक सामाजिक व राजकीय सर्व क्षेत्रामध्ये महिलांना पुरुषाच्या बरोबरीने हक्क व दर्जा प्रदान करून देणे. विकासासाठी संधी उपलब्ध करून देणे या प्रक्रियेला स्त्री-समक्षीकरण असे म्हणतात, त्याचबरोबर सर्व महिलांनी आपले स्वरक्षण करण्यासाठी कराटे, मार्शल आर्ट इत्यादी शिकणे यास सर्वांनी सहमती दर्शविली.

ठराव क्र ४) अध्यक्षांच्या परवानगीने वेळेच्या विषयानुसार भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन अंतर्गत आंबेगाव पठार पोलीस चौकीचे मुख्य पोलीस अधिकारी यांनी प्रत्यक्ष शाळेला भेट देऊन सर्व विद्यार्थीनींना महिला सुरक्षा या विषयावर मार्गदर्शन केले. यामध्ये सध्या घडत असलेल्या ऑन लाईन घटना ही सांगितल्या व मुलींना स्वत:चे संरक्षण करण्याकरिता कोणत्या गोष्टी करणे गरजेचे आहे हे ही सांगितले. त्यांनी सर्वांना स्वरक्षणाविषयी योग्य ते मार्गदर्शन केले. व सर्वांनी या ठरावास मंजूरी दिली

अशा प्रकार सभेवेळीचे विषय संपल्याने सहशिक्षिका यांनी उपस्थित सर्व सभासदांचे आभार मानले. व सभा समाप्त झाली असे जाहीर केले.

Chairman : Mrs. Anuradha Allam

Vice Chairman : Mrs. Usha Patil

Secretary : Mrs. Vidya Beske

Joint Secretary : Mrs . Nutan Kshirsagar

| Sr.No | Name of Parents | Sign | STD | Name of the Teacher | Sign |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Mr. Manohar Pardeshi | Pardeshi | I | Mrs. Usha Patil | [signature] |
| 2 | Mrs. Sheetal Pawaskar | Pawaskar | II | Mrs. Sayali Bansode | [signature] |
| 3 | Mrs. Ashwini Surgude | A.A.Surgude | III | Mrs. Kaveri Chavan | |
| 4 | Mrs. Ashwini Sahane | Sahane | IV | Mrs. Neha Gotad | Gotad |
| 5 | Mrs.Kavita Joshi | K.Joshi | V | Mrs. Jyoti Supekar | [signature] |
| 6 | Mrs.Swati Rajane | S.Rajane | VI | Mrs. Vidya Beske | [signature] |
| 7 | Mrs. Shibha Nagtilak | S.Nagtilak | VII | Mrs. Soniya Shrivastav | [signature] |
| 8 | Mrs.Meena Hanvate | M.Hanvate | VIII | Mrs. Pratima Kasture | [signature] |
| 9 | Mrs.Ujwala Thopte | U.Thopte | IX | Mrs. Nutan Kshirsagar | NKshirsagar |
| 10 | Mrs.Renuka Sharma | Renuka | X | Mrs. Lohita Jagtap | |